जनसामान्यांची महाशक्ती

# नवशक्ति

सा शक्तिर्या विमुक्तये

www.navshakti.co.in | मुंबई | वर्ष ८४ वे अंक : १२७ | शनिवार, १७ मार्च २०१८ | पाने २२ | किंमत ३ रुपये | Reg.No.MCS/049/2018-20 M.P.C.S. Office Mumbai-400001

## गोंधळामुळे अविश्वास ठराव लांबला

नवी दिल्ली, दि. १६(वृत्तसंस्था) – आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीवरुन मोदी सरकारविरोधात संसदेत अविश्वास ठराव मांडण्यात येणार होता पण गदारोळामुळे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आल्याने आता या ठरावावर सोमवारीच निर्णय होणे अपेक्षित आहे. या ठरावाला तृणमूल काँग्रेस, तेलगू देसम पक्ष, एमआयएमने पाठिंबा दिला आहे. काँग्रेसनेही या प्रस्तावाला पाठिंबा देण्याचे संकेत दिले आहे. तर शिवसेना या ठरावात तटस्थ राहणार असल्याची चर्चा आहे. विरोधकांनी संसदेत अविश्वास ठराव मांडण्याची तयारी सुरु केली असतानाच लोकसभा व राज्यसभेत विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे कामकाज तहकूब करण्यात आले. राज्यसभेचे कामकाज दुपारपर्यंत तहकूब करण्यात आले. तर लोकसभेतील कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

### मुंबईचे तापमान

कमाल : ३३.०० अं.से.

किमान : २५.०० अं.से.

### शेअर बाजार

सेन्सेक्स : ३३,१७६ (-५०९.५४)

निफ्टी : १०,१९५ (-१६५.००)

| सोने | चांदी |
|---|---|
| ₹ ३०,२०९ (१० ग्रॅम) | ₹ ३८,३२६ (१ किलो) |

### पॉवरलाईन

संजय मिस्त्री



वातावरणातील बदलाचा त्यांना त्रास झालाय. होय, उत्तर प्रदेशातल्या!!

चैतन्य साधना | विचारांचा करा विचार – जीवन विद्या मिशन (पान- ५ वर)

संपादकीय पान-६ प्लास्टिकबंदीचे शिवधनुष्य! अग्रलेख

व्यापार युद्ध आणि तेलुगू देसमच्या निर्णयाचे बाजारात तीव्र पडसाद, सेन्सेक्स ५१० अंकांनी गडगडला (अर्थशक्ति पान)

## शीतगृहांची साखळी : भविष्यातील उदयोन्मुख क्षेत्र




फ्री प्रेस जर्नल आणि मनीकंट्रोलतर्फे इंडियन मर्चंट चेंबरमध्ये शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सहभागी झालेले ब्लू स्टारचे सहव्यवस्थापकीय संचालक बी. त्यागराजन, डॅनफोस इंडियाचे अध्यक्ष रविचंद्रन पुरुषोत्तम, फ्री-प्रेस जर्नलचे सल्लागार संपादक आर. एन. भास्कर, आयएनआय फार्मचे व्यवस्थापकीय संचालक पंकज खंडेलवाल, ईवाय कॉर्पोरेट फायनान्स स्ट्रॅटेजीचे संचालक किरण मल्ला आणि एनसीसीडीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पवनेख कोहली. (सविस्तर वृत्त – अर्थशक्ति)

# राज्यात गुढीपाडव्यापासून प्लास्टिक, थर्माकोलवर बंदी

## उल्लंघन केल्यास तीन महिन्यांचा कारावास

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, शुक्रवार – राज्यात येत्या रविवारी म्हणजेच गुढीपाडव्यापासून प्लास्टिक आणि थर्माकोलवर बंदी लागू होणार आहे. ज्याला पर्याय उपलब्ध आहे अशा सर्व प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे. प्लास्टिकच्या दुधाच्या पिशव्या आणि पिण्याच्या पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या यांच्यावर तात्काळ बंदी घालणे शक्य नसल्याने त्यांची पुनर्निमिती केली जाणार आहे. त्यासाठी ग्राहकाने दुधाची पिशवी परत केल्यानंतर ५० पैसे तर पाण्याची बाटली परत केल्यानंतर १ रूपया परत मिळणार आहे. याचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादक, विक्रेते आणि वापरकर्ते यांना तीन महिन्यांचा कारावास तसेच २५ हजार रूपयांपर्यंतचा दंड अशी शिक्षा ठोठावण्यात येणार आहे, अशी घोषणा पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी विधानसभेत केली.

राज्यात प्लास्टिक तसेच थर्माकोलवर बंदी घालण्यात येणार असल्याची घोषणा पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी याआधीच केली होती. गुरूवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आला.

### २५ हजारांचा दंड; दुधाच्या पिशव्या, बाटल्यांना वगळले



**या वस्तूंवर बंदी**

प्लास्टिकच्या पिशव्या, पॅकेजिंगसाठी वापरले जाणारे प्लास्टिक, सर्व प्रकारचे प्लास्टिक वेष्टन, थर्माकोलपासून तयार केलेल्या प्लेटस्, कप, ग्लास, वाटी, काटे, चमचे, स्ट्रॉ, कटलरी, स्प्रेड शीटस्, प्लास्टिक पाऊच, पॅकेजिंगसाठी वापरले जाणारे प्लास्टिक आदीवर बंदी घालण्यात आलेली आहे.

**यांना वगळले**

दुधाच्या पिशव्या आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या यांना या बंदीतून वगळण्यात आले आहे. दुधाच्या पिशव्या तसेच पाण्याच्या बाटल्या यांचा पुनर्वापर करण्यासाठी त्या पुन्हा खरेदी करण्याची अट असणार आहे. अन्न साठवण्याचा दर्जा असलेल्या ५० मायक्रॉनपेक्षा जाड प्लास्टिकच्या पिशव्या, औषधांचे वेष्टन, कृषी, वन आणि फलोत्पादन, रोपवाटिकांसाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक, प्लास्टिक पिशव्या व शिटस् यांना बंदीतून वगळण्यात आले आहे. पण ते संबंधित कारणासाठी वापरले जाणार असल्याचे स्पष्टपणे लिहिणे बंधनकारक असणार आहे. विशेष आर्थिक क्षेत्र, निर्यात उद्योग, यात फक्त निर्यातीसाठीचे प्लास्टिक व प्लास्टिकच्या पिशव्या या बंदीतून वगळण्यात आल्या आहेत. या प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शहरी भागात महापालिका, नगरपालिकांवर तर ग्रामीण भागात महसूल यंत्रणेवर असणार आहे. पर्यावरणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती बनविण्यात येणार असून ही समिती या नियमांमध्ये भविष्यात आवश्यक त्या सुधारणा करणे व अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घेऊन निर्णय घेणार आहे. तसेच अविघटनशील कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी सरकारला तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ समिती देखील स्थापन करण्यात येणार आहे.

# कचरा भोवला!

## औरंगाबाद आणि कल्याण-डोंबिवली मनपा आयुक्तांना हटविले

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, शुक्रवार – औरंगाबाद मनपा क्षेत्रातील कचरा डेपो आणि कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे व कचरा डेपोला लागलेली आग या दोन्ही प्रकरणांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली असून त्या दोघांचीही उचलबांगडी करण्यात आली आहे. त्यामुळे औरंगाबाद मनपा आयुक्त दीपक मुगळीकर यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या सदस्य सचिव पदावर तर कल्याण-डोंबिवली मनपा आयुक्त पी. वेलरासू यांची सह व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ येथे बदली करण्यात आली आहे. यासोबत सहा सनदी अधिकाऱ्यांच्याही बदल्या केल्या



आहेत. विशेष म्हणजे नवे पालिका आयुक्त या दोन्ही शहरांतील कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी होतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सुट्टीवर असलेले जी. बी. पाटील यांना उल्हासनगर मनपा आयुक्त पदावर पाठविण्यात आले असून अरुण विधळे

सह सचिव कामगार विभाग यांची, मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त पदावर नियुक्ती केली आहे. उल्हासनगर मनपा आयुक्त पदावर असलेले राजेंद्र निंबाळकर यांची पुणे मनपाच्या अतिरिक्त आयुक्त पदी तर मत्स्यव्यवसाय आयुक्त असलेले जी. एम. बोडके यांना कल्याण-डोंबिवली मनपाच्या आयुक्त पदावर पाठविले आहे. सध्या औरंगाबाद येथील कचरा प्रश्न पेटलेला आहे. या प्रकरणी टीकेचे धनी ठरलेले आयुक्त मुगळीकर यांची उचलबांगडी केली गेली आहे. तर दुसरीकडे अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणारे पी. वेलरासू यांची बदली राजकीय हस्तक्षेपामुळे झाल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे कल्याण-डोंबिवली आणि औरंगाबाद या दोन्ही महापालिका शिवसेनेच्या ताब्यात असून दोन्ही ठिकाणी कचराकोंडी झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागला आहे.

### उल्हासनगरचे आयुक्त राजेंद्र निंबाळकर यांची बदली

उल्हासनगर – २०१७ च्या पालिका निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांना निधीसाठी रखडवून ठेवणारे आयुक्त राजेंद्र निंबाळकर यांची पुण्याला अतिरिक्त आयुक्त पदावर बदली झाली आहे. त्यांच्या जागी गणेश पाटील यांची उल्हासनगर महानगरपालिका आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. ते सोमवारी आयुक्त पदाचा पदभार स्वीकारणार असून नागरीसुविधा आणि विकासकामांना प्राधान्य देताना उल्हासनगरला स्मार्ट सिटी बनवण्याचा ध्यास त्यांनी व्यक्त केला आहे.

### इरफान खानला न्यूरोएन्डोक्राइन ट्यूमर

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – गेल्या काही दिवसांपासून अभिनेता इरफान खान याच्या प्रकृतीविषयी अनेकांनी चिंता व्यक्त केली आहे. तथापि, त्याने केलेल्या ट्विटनंतर तो नेमका कोणत्या दुर्धर आजाराचा सामना करत आहे,



हाच प्रश्न अनेकांच्या मनात घर करून होता. आता या सर्व प्रश्नांची उत्तरे समोर आली आहेत. खुद्द इरफाननेच ट्विट करत त्याला झालेल्या आजाराविषयी माहिती दिली आहे. इरफान खानला न्यूरोएन्डोक्राइन ट्यूमर हा आजार झाल्याचे निदान झाले आहे. आयुष्याकडून अपेक्षांप्रमाणेच सर्व गोष्टी मिळतातच असे नाही, अशा आशयाची मार्गारेट मिशेल यांची ओळ लिहित त्याने आपल्या आजाराविषयीची माहिती दिली.

### नोटाबंदी, जीएसटीला कंटाळून सोने व्यापाऱ्याची आत्महत्या

कराड, दि. १६ (वृत्तसंस्था) – सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील एका सोने व्यापाऱ्याने जीएसटीला कंटाळून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राहुल फाळके असे या व्यापाऱ्याचे नाव असून, आत्महत्येपूर्वी फाळके यांनी फेसबूक पोस्ट लिहून नरेंद्र मोदी सरकारने लागू केलेली नोटाबंदी आणि जीएसटीमुळे आपल्याला व्यवसायात किती नुकसान होते आहे याची कहाणी सांगितलेली आहे. त्यासोबत आपल्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरु नये असे आवाहन करत फाळके यांनी आपल्या कुटुंबाची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. मोदींनी नोटाबंदी आणि जीएसटी कायदा लागू केल्यानंतर सोने-चांदी व्यवसायाला उतरती कळा लागली आहे. आमचा धंदा उधारीवर चालतो, त्यामुळे प्रत्येकवेळी गरज असताना मी सर्वांना मदत केली. पण मला या बदल्यात केवळ विश्वासघातच मिळाला, अशा आशयाची पोस्ट टाकत फाळके यांनी आयुष्य संपविले आहे.

## मानवी तस्करी: गायक दलेर मेहंदीला २ वर्षे तुरुंगवास

**वृत्तसंस्था**

पतियाळा, दि. १६ – प्रसिद्ध पंजाबी पॉप गायक दलेर मेहंदी याला २००३ मधील मानवी तस्करी प्रकरणी पंजाबमधील एका स्थानिक न्यायालयाने दोषी ठरविले असून, दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. दलेर मेहंदीचा भाऊ शमशेर सिंग यालाही या प्रकरणात दोषी ठरविण्यात आले आहे. सध्या दलेर हा पंजाब पोलिसांच्या कोठडीत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अवैधरित्या लोकांना विदेशात पाठवल्याप्रकरणी दलेर मेहंदी आणि शमशेर सिंग या दोघांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. १९९८ आणि १९९९ या कालावधीत या दोघांनी १० जणांना अवैधपणे अमेरिकेला पाठविले होते. त्यासाठी त्यांच्याकडून पैसेही घेतले होते. या प्रकरणी या दोघांविरोधात २००३ मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले होते. दलेरने १९९८ आणि १९९९ मध्ये अमेरिकेत काही शो केले होते. टीममधील १० सदस्यांना अमेरिकेत सोडून तो भारतात परतला होता. तसेच एका नायिकेसोबत अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या दलेरने आपल्या टीममधील तीन मुलींना सॅन फ्रान्सिस्कोमध्ये सोडले होते. दरम्यान, २००६ साली पतियाळा पोलिसांनी न्यायालयात दलेर मेहंदी निर्दोष असल्याच्या दोन याचिका दाखल केल्या होत्या.



## अखेर चंद्राबाबूंनी एनडीएची साथ सोडली

**वृत्तसंस्था**

नवी दिल्ली, दि. १६ – उत्तर प्रदेशच्या पोटनिवडणुकीतील पराभवानंतर भाजपला आणखी एक धक्का बसला आहे. चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तेलुगू देसम पक्षाने अखेर भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असून त्याची लवकरच औपचारिक घोषणा केली जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. आंध्रप्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी टीडीपीने शुक्रवारी हा निर्णय घेतला.

टीडीपीचे सर्वेसर्वा आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी आज पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलावली होती. त्यात केंद्र सरकारचा पाठिंबा काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वसंमतीने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. आंध्रप्रदेशला विशेष दर्जा मिळावा अशी मागणी तेलुगू देसमने केली असून ती मान्य होत नसल्याने गेल्याच आठवड्यात तेलुगू देसमच्या दोन मंत्र्यांनी राजीनामे दिले होते. त्यावेळी तेलुगू देसमने एनडीएतच राहण्याची भूमिका घेतली होती. मात्र तरीही मागणी मान्य होत नसल्याने नायडू हे एनडीएतून बाहेर पडण्याचा निर्णय घेऊ शकतात, अशी शक्यता वर्तविली जात होती.

## नवशक्ति व्यासपीठ

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे का?



आपल्या न्याय्य मागण्यांकडे महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आधी संप करणाऱ्या आणि आता नाशिक ते मुंबई असा लांबचा पल्ला चालत गाठणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे का? याविषयी वाचकांनी आपली मते स्वत:च्या छायाचित्रासह 'नवशक्ति व्यासपीठ' या सदरासाठी शनिवार, १७ मार्च २०१८ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत पाठवावीत.

ई-मेल :- navshakti.news@gmail.com

अंतिम मुदत : – १० मार्च २०१८, शब्द मर्यादा :- ३०० शब्द

– संपादक

# हे सरकार अल्पसंख्याकांच्या विरोधात आहे का?

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, शुक्रवार – राज्य सरकारचे अल्पसंख्याक विभागाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी पुन्हा आपल्याच सरकारवर हल्लाबोल केला आहे. हे सरकार अल्पसंख्याकांच्या विरोधात आहे की काय? असा प्रश्न पडतो असे म्हणत त्यांच्यासाठी निधी द्यायचा नसेल तर त्यांना किमान आशेवर तर ठेवू नका अशा शब्दात खडसे यांनी हल्ला चढविला. अर्थसंकल्पाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना खडसे यांनी इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा आणि तालुक्यांमध्ये वसतिगृहांची मागणी करत सरकारच्या जलयुक्त शिवार आणि पर्यटन विभागावर चांगलेच ताशेरे ओढले. यावेळी त्यांनी वृद्ध कलावंतांना त्यांचे मानधन महिन्याच्या महिन्याला देण्याची व मानधनात वाढ करण्याची मागणी केली.

**पॉलिटेक्निक आणि तंत्र महाविद्यालय कुठे आहे?**

अल्पसंख्याक विभागाच्या संदर्भात गेल्या तीन वर्षांपूर्वी पहिले पॉलिटेक्निक माझ्या मतदारसंघात उभारण्याचा निर्णय झाला. त्यासाठी जागा दिली, टेंडर काढले. मात्र निधीची तरतूद नसल्यामुळे तंत्र विद्यालय होऊ शकले नाही, असा आरोप खडसे यांनी केला. या निधीसाठी मी सगळीकडे फिरलो, मात्र निधी मिळालेला नाही. यांच्या मनात अल्पसंख्याकांसाठी काय भावना आहेत हे ओळखू येतेय, असा टोलाही त्यांनी लगावला. त्यांच्यासाठी निधी द्यायचा नसेल तर तसे स्पष्ट सांगा. मात्र उगाच आशेवर ठेवायचे बंद करा, असेही ते म्हणाले.

सरकारच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेची कामे निधी अभावी बंद पडली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. त्यांना पैसे उपलब्ध करून देण्याबाबत सांगितले जाते. मात्र तांत्रिक अटी अशा घातल्या की प्रस्ताव अडकून पडले आहेत. जलसंधारणाची किती कामे सुरु आणि किती कामे झालीत? असा सवालही त्यांनी केला. पहिल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्केही कामे सुरु नसल्याचे ते म्हणाले.

**जलयुक्तमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार | एकनाथ खडसे यांचा सरकारवर घणाघात**



### मराठीला अभिजात दर्जा केव्हा देणार?

राज्यामध्ये मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा असे सांगत आपणच विरोधी पक्षात असताना या मागणीसाठी अनेकदा सभागृह बंद पाडले होते. आता आपले सरकार आहे, नेमकी अडचण काय? असा सवाल खडसे यांनी केला. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची गोष्ट असून त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. मराठीचा प्रचार व्हावा, वापर व्हावा यासाठी सर्वांनी आग्रही असणे गरजचे आहे असे ते म्हणाले.

### पर्यटन विभागात सुधारणा करा!

राज्यात पर्यटन धोरण बदल करण्याची आवश्यकता असल्याचे खडसे यांनी सांगितले. राज्यामध्ये अजूनही अनेक क्षेत्रांचा विकास केला तर बाहेरच्या पर्यटकांना आपण आकर्षित करू शकतो, असे ते म्हणाले. शेजारच्या गुजरात, मध्यप्रदेश आदी राज्यात पर्यटनाबाबत मोठी जाहिरातबाजी करून पर्यटकांना आकर्षित केले जाते. मात्र आपला पर्यटन विभाग त्यात कमी पडतोय असे चित्र दिसत आहे, असे त्यांनी सांगितले.

नवशक्ति

रविवार, १८ मार्च २०१८




राजकारण : डॉ.भारतकुमार राऊत | राशी भविष्य: डॉ. सविता महाडिक

कथा कुंज : डॉ. विजया वाड | ध्यासपर्व : तृप्ती राणे | तिसरी घंटा : शरद विचारे

माया बाजार : मंदार जोशी




ललित : मनीषा सोमण




सोबत नेहमीची वाचकप्रिय सदरं!